## नि.क्र.१०४ च्या आदेशावरुन वादीतर्फे साक्षीदार क्र. २.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव –** समीर अमीरहमजा खडकवाले.

**वय** - ४९ वर्ष, **व्यवसाय** - उपअधिक्षक, भूमि अभिलेख,

**नेमणूक** - उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, राधानगरी, जि. कोल्हापूर.

**वादीतर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. मी सन १९९७ पासून उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयात कार्यरत आहे. मी सन २०१२ मध्ये निमतानदार म्हणून उपअधिक्षक भूमि अभिलेख, आजरा कार्यालयात कार्यरत होतो. त्यावेळी सदर प्रकरणातील मोजणीचे काम काटकर साहेबांनी माझ्याकडे दिले होते. मी मोजणी केलेल्या कामाची संपुर्ण मूळ कागदपत्रे न्यायालयात दाखल केलेली आहेत.

**२.** आता मला सदर प्रकरणात मोजणी करण्याबाबत दि. ०२.०३.२०१२ रोजी दिलेला आदेश दाखवला, त्यावरती काटकर साहेबांची स्वाक्षरी आहे. त्याला **नि. क्र. १०७** देण्यात येतो. मला सदर आदेशा सोबत मोजणी चलन, सातबारा उतारा, न्यायालयाच्या आदेशाची आणि वादी व प्रतिवादींचे अर्ज व त्यावरील लेखी म्हणण्याची प्रत मिळाली होती. मी त्याप्रमाणे वादी व प्रतिवादींना नोटीसा काढल्या होत्या. त्यानंतर वादी क्र.२ ने न्यायालयाने मोजणी आदेशामध्ये सुधारणा केलेली असल्यामुळे त्याप्रमाणे मोजणी होण्याबाबत दि.०७.०५.२०१२ आमच्या कार्यालयात अर्ज दिला होता. आता मला तो अर्ज दाखवला, त्याला **नि. क्र.१०८** देण्यात येतो.

**३.** त्यानंतर मोजणीसाठी दि.०४.०८.२०१२ तारीख निश्चित करण्यात आली होती. आता मला वादी व प्रतिवादींना उपअधिक्षकांच्या स्वाक्षरीने दिलेल्या नोटीसीची प्रत दाखवली, त्यावरती आमच्या कार्यालयाचा शिक्का असून काटकर साहेबांची स्वाक्षरी आहे. त्याला **नि. क्र. १०९** देण्यात येतो. दि.०४.०८.२०१२ रोजीची मोजणी ऊसाचे उंच पिक असून सतत पाऊस पडत असल्यामुळे होऊ शकली नव्हती. त्याबाबत वादी व प्रतिवादीचा मी जबाब घेतला होता. आता मला तो जबाब दाखवला, त्याला **नि.क्र.११०** देण्यात येतो.

४. त्यामुळे दि.१७.१०.२०१२ रोजी नवीन मोजणी तारीख निश्चित करण्यात आली होती. आता मला त्याबाबत वादी व प्रतिवादींना दिलेल्या नोटीसीची प्रत दाखवली, तिला **नि. क्र. १११** देण्यात येतो. दि.१७.१०.२०१२ रोजी देखील मोजणी होऊ शकली नव्हती. त्यावेळी माझी निवडणूक कामात नियुक्ती झाल्यामुळे त्याबाबतचे वादी व प्रतिवादींचा जबाब घेण्यात आला होता. आता मला तो जबाब दाखवला, त्याला **नि. क्र. ११२** देण्यात येतो.

५. त्यानंतर पुन्हा मोजणीसाठी दि.१७.११.२०१२ तारीख निश्चित करुन त्याबाबतची वादी व प्रतिवादींना कार्यालया मार्फत नोटीस देण्यात आली होती. आता मला ती नोटीस दाखवली, त्यावरती आमच्या कार्यालयाचा शिक्का असून वरिष्ठांची स्वाक्षरी आहे, तिला **नि. क्र. ११३** देण्यात येतो. त्याप्रमाणे मी ग्रामपंचायत किणे येथे गेल्यानंतर वादी व प्रतिवादीं समक्ष न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गट क्र.४० मधील वादातील जागेची मोजणी केली होती.

६. मी सदर मोजणी प्लेन टेबलच्या साहाय्याने केली होती. मी त्याबाबत वादी व प्रतिवादींनी दाखविल्या प्रमाणे चुना टाकून वहिवाटीच्या खुणा केल्या होत्या. मी संपुर्ण गट क्र.४० मोजला होता. मी त्याप्रमाणे मोजणी नकाशा तयार करुन त्याच्या प्रती कार्यालयात छाननीसाठी सादर केल्या होत्या. त्यानंतर कार्यालयामार्फत नकाशाची मूळ प्रत मोजणी अहवालासह न्यायालयात नि. क्र.४५ प्रमाणे सादर करण्यात आलेली आहे.

७. मी केलेल्या मोजणीचा उपअधिक्षक साहेबांना अहवाल सादर केलेला आहे. आता मला तो अहवाल दाखविला, तो माझ्या हस्ताक्षरात लिहिण्यात आलेला असून त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. त्याला **नि. क्र. ११४** देण्यात येतो. आता मला न्यायालयात सादर केलेली नकाशाची अ प्रत दाखवली. मी तो नकाशा तयार केलेला असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. त्याला **नि. क्र.११५** देण्यात येतो.

८. मी सदर नकाशा मध्ये प्रतिवादी क्र.१ संस्थेच्या इमारतीच्या दक्षिणेपासून डांबरी रस्त्यापर्यंतचे आणि संस्थेने पाडलेल्या खोलीच्या मोजमापासह वस्तूस्थितीचा उल्लेख केलेला नाही. मला मोजणी करताना पाडलेल्या खोलीचे अवशेष मिळून आले नव्हते.

**(साक्षीदार सहकार्य करत नसल्यामुळे वादीच्या वकिलांनी त्याला उलट तपासातील प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली आहे. सदर मागणीस प्रतिवादी क्र.१ च्या वकिलांनी नकाशा**

**निशाणीकृत झालेला असल्यामुळे आक्षेप घेतला आहे. मोजणीची वस्तूस्थिती पटलावर येणे आवश्यक असल्यामुळे वादीला उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

९. हे म्हणणे खरे नाही की, मला वादीने प्रतिवादी क्र.१ च्या इमारतीच्या दक्षिणेकडील पाडलेली खोली दाखवली होती. मी नकाशामध्ये रस्त्यासाठी दाखवलेली जागा गट क्र.४० चा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी प्रमाणे गट क्र.४० चे दक्षिणेकडील ०.८१ आर संपुर्ण क्षेत्र रस्त्यात गेलेले आहे. मी नदीपात्राची मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मोजणी दरम्यान दाखविलेले त्याचे दुसरे शेड व शौचालय मी नकाशात दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या मोजणी दरम्यान दरवाजे दाखविणे आवश्यक असून देखील मी वादी व प्रतिवादींच्या इमारतीचे प्रवेश दरवाजे दाखविलेले नाहीत.

**१०**. मला प्रतिवादींनी गट क्र.४० मधील खरेदी क्षेत्राचे विक्रीपत्र दाखविले नव्हते. त्यामुळे मी त्याप्रमाणे त्यांचे क्षेत्र मोजलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नकाशात नारंगी रंगाने दाखवलेले स्नानगृह व शौचालयाची जागा प्रतिवादींच्या ताब्यातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मालकी हक्काच्या कागदपत्रांच्या अनुपस्थितीत संदिग्ध व अपुर्ण मोजणी नकाशा तयार केला आहे.

**<u>प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास – श्री. आर. आर. चव्हाण वकील.</u>**

**११.** मी नकाशात उत्तर–पश्चिम कोप–यात दाखवलेला गवतपडचा भाग गट क्र.४० चा नसून ते अतिक्रमित क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नकाशातील उत्तरेकडील नदीपडचा भाग अंदाजे दाखविलेला आहे. मी नकाशामध्ये वादीच्या घरापासून नेसरी रस्त्यामध्ये अतिक्रमण झाल्याचे काळया तुटक रेघेने दाखविलेले आहे. मी नकाशामध्ये नारंगी रंगाने दाखविलेल्या खुल्या जागेतील रस्त्यात समाविष्ट झालेले क्षेत्र ८१ चौ.मी. आहे. मला मोजणीमध्ये प्रतिवादी क्र.१ ने ०.०२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त जास्तीचे अतिक्रमण केल्याचे आढळून आले नाही.

**१२**. मी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गट क्र.४० ची मोजणी केलेली आहे. मी मोजणी करताना ती चुकीची झाल्याबाबत वादीने तक्रार केली नव्हती. मी वादी व प्रतिवादीं समक्ष त्यांनी दाखविलेल्या वहिवाटीच्या खुणा केल्यानंतर मोजणी केली होती. मी ३० मिटरच्या

प्लॅस्टीकच्या टेपने अंतर मोजले होते. मोजणी दरम्यान टेप ताणून अथवा ढिला सोडल्यास ५ ते १० पॉईंटचा फरक पडू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे संपूर्ण मोजणीमध्ये फरक पडू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी नकाशात दाखविलेले मोजमापाचे परिमाण मूळ अभिलेखा प्रमाणे नाही. मी मोजणी दरम्यान वादी व प्रतिवादींचे बांधकाम ३५ वर्षे जुने असल्याचे आढळून आल्याबाबत सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला मदत करण्यासाठी खोटा नकाशा तयार करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०६.०१.२०२५.

आजरा.

(आर. पी. थोरे)

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.